शेतकरी कैलास नागरे यांच बलीदान व्यर्थ जाऊ देणार नाही >>पान 2
भाजपचे टोळ्या एकत्र येऊन स्थापन झालेले सरकार >>पान 3
कैलास नागरे यांच्या कुटुंबांना शासनाने तात्काळ मदत करावी >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
वेळ प्रत्येकाला संधी देते, पण तीच संधी घेऊन ती परत येत नाही.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 213 ■ सोमवार, दि. 17 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



'या' सुपरस्टारसाठी १० वर्षे वाट पाहिली, तरीही तब्बूचं प्रेम कधी लग्नापर्यंत पोहोचलंच नाही!

# संत तुकाराम बीज सोहळा उत्साहात साजरा!

**दैनिक आपला विदर्भ**

**देहू/प्रतिनिधी : देहूनगरीत आज जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांचा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळा संपन्न होत आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्यभरामधून लाखो भाविक देहूत दाखल झाले आहेत. टाळ-मृदुंगाचा गजर आणि ज्ञानोबा-तुकोबाचा जप करीत राज्यभरातून अनेक दिंड्या देहूनगरीत दाखल झाल्या आहेत. त्यामुळे इंद्रायणी नदीचा काठ वारकऱ्यांच्या गर्दीने फुलून गेला आहे.**



दरम्यान, बीज सोहळ्यानिमित्त मुख्य मंदिर आणि गाभाऱ्याला आकर्षक सजावट करण्यात आली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हजेरी लावली असून ७५व्या बीज सोहळ्यानिमित्त एकनाथ शिंदे यांचे देहून संस्थानाकडून गौरव करण्यात आला आहे. त्याचबरोबर त्यांना संत तुकाराम महाराज पुरस्काराने स्नमानित करण्यात आले आहे.

**नगरपंचायत प्रशासनाकडून विविध कामांचे आयोजन**

बीज सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू नगरपंचायत प्रशासनाकडून विविध कामे करण्यात आली असून पाणीपुरवठा स्वच्छतासाठी सज्ज आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने गाथा मंदिर, मुख्यमंदीर, वैकुंठस्थान मंदिर, मुख्य कमान, बीएससी केंद्रामध्ये बाह्य रुग्ण तपासणी केंद्र उभारण्यात आले असून मुबलक औषध साठा उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचबरोबर लाखो वारकऱ्यांच्या सोयी सुविधा आणि सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मुख्य मंदिर वैकुंठ गमन स्थान मंदिर परिसर, तसेच नगरपंचायत प्रशासनाकडून सुमारे ३० ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले आहेत. देहूमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व मार्ग बीज सोहळ्यासाठी बॅरिकेटिंग उभारून बंद करण्यात आले आहेत.

## पदपथ, रस्त्यांवर व्यवसायास बंदी

देहूनगरीत सोहळ्यानिमित्त पदपथावर तसेच रस्त्यांवर फळे, फुल विक्रेते, खेळणी व इतर साहित्य, खाद्यपदार्थ विक्रेते हातगाड्या लावून, तसेच रस्त्यांवरील जागा अडवून विक्री व्यवसाय करतात. त्यामुळे रस्ता अरुंद होऊन चेंगराचेंगरी घडण्याच्या शक्यता आहे. पाकीट, मोबाईल, दागिन्यांची चोऱ्या घडण्याच्या घटनाही घडतात. यामुळे भाविकांच्या सोयी सुविधा व सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी बीज सोहळ्यासाठी दोन दिवसांसाठी पदपथांवर आणि रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्यांना बंदी करण्यात आली आहे.

## तुकाराम बीज काय आहे?

संत तुकाराम महाराजांचा जन्म देहू गावात वसंत पंचमीला माघ शुद्ध पंचमीला झाला. तर त्यांचं वैकुंठ-गमन फाल्गुन वद्य द्वितीयेला झालं असं मानलं जातं. संत तुकाराम महाराजांना देव सदेह वैकुंठात घेऊन गेल्याची मान्यता आहे. या दिवसाला तुकाराम बीज म्हटलं जातं. तुकाराम महाराजांचं वैकुंभगमन देहू (पुणे) येथे इ.स. १६४९ मध्ये झाले, असं वारकरी संप्रदाय मानतो. या दिवशी नांदुरकी वृक्ष (देहू येथील एक झाड) दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी हलतो, असा भक्तांचा विश्वास आहे. वारकरी संप्रदायासाठी हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. यावेळी पंढरपूरहून आणि इतर गावांमधून मोठ्या संख्येने वारकरी देहू येथे येतात. नामस्मरण, कीर्तन, प्रवचन, भजन आणि गाथा पारायणाचे आयोजन होते.

# सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण, कर्नाटक सरकारचा निर्णय, भाजपकडून काँग्रेसवर टीका

**कर्नाटक :** कर्नाटक मंत्रिमंडळाने मुस्लीम कंत्राटदारांना निविदांमध्ये चार टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी कर्नाटक सार्वजनिक खरेदीमध्ये पारदर्शकता कायद्यात सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. कर्नाटक सरकारच्या या निर्णयानंतर भाजपने त्यांच्यावर जोरदार टीका केली. मंत्रिमंडळाने कर्नाटक ग्राम स्वराज आणि पंचायत राज (सुधारणा) विधेयकालाही मान्यता दिली आहे. कर्नाटक लोकसेवा आयोगात सुधारणा करण्यासाठी उपाययोजनांवर शुक्रवारी मंत्रिमंडळाने चर्चा करण्यात आली. मात्र केटीपीपी कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय वादग्रस्त ठरला आहे. विरोधी पक्ष असलेल्या भाजपने राज्य सरकारचा निर्णय चुकीचा आणि असंवैधानिक असल्याची टीका केली.

या निर्णयामुळे राष्ट्रीय एकात्मता कमकुवत होईल, अशी भीती भाजपने व्यक्त केली. विरोधी पक्षांमधील मतपेढीच्या राजकारणाचे काँग्रेसने नेतृत्व करावे यासाठी राहुल गांधी प्रयत्न करत आहेत. कर्नाटक सरकारने मुस्लीम कंत्राटदारांसाठी आरक्षण देण्याच्या निर्णयामागे त्यांचा हात असल्याचा दावा प्रसाद यांनी केला आहे. काँग्रेसच्या अशा निर्णयांमुळे राजकारणाविरोधात असलेल्या आणि देशाच्या विकासासाठी उभे राहणाऱ्या मुस्लिमांचा आवाज कमकुवत होतो. स्वातंत्र्य चळवळीदरम्यान मुस्लिमांना वेगळी वागणूक देण्याच्या मागण्यांमुळे देशाची फाळणी झाली. कर्नाटक सरकारने मुस्लिमांसाठी ४ टक्के आरक्षणाचा ठराव राहुल गांधींच्या पूर्ण पाठिंब्याने मंजूर झाल्या असं भाजपचे नेते रविशंकर प्रसाद म्हणाले.

कर्नाटक सरकारच्या या निर्णयामुळे सध्या राजकारण प्रचंड तापल्याचे पाहायला मिळत आहे. कर्नाटक सरकारच्या राज्य मंत्रिमंडळाने शनिवारी कर्नाटक ट्रान्सपरन्सी इन पब्लिक प्रोक्यूरमेंट कायद्यातील सुधारणेला मंजुरी दिली आहे. यामुळे १ कोटी रुपयांपर्यंतच्या टेंडर्समध्ये मुस्लिम कंत्राटदारांना आता ४ टक्के आरक्षण देण्याचा मार्ग राज्य सरकारने म ोकळा केला आहे.

७ मार्च रोजी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला होता. अर्थसंकल्प सादर करत असताना मुख्यमंत्री म्हणाले की, एजन्सी, विविध सरकारी विभाग आणि संस्थांअंतर्गत येणाऱ्या सर्व सार्वजनिक कामांच्या कंत्राटांपैकी ४ टक्के ही आता श्रेणी-२ ब अंतर्गत मुस्लिम समुदायासाठी राखीव असणार आहेत.




# ऐकावे ते नवलच पहिली योजना अर्धवट पुन्हा वीस कोटीच्या निधीची तरतूद




# दोन वर्षानंतरही कऱ्हाडवाडी पाण्याचा प्रश्न कायम; गावकरी त्रस्त, अधिकारी व कंत्राटदार मात्र मस्त

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव : तालुक्यातीलच नव्हे तर, जिल्ह्यातील सर्वात मोठे ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या डोणगाव ग्रामपंचायत मधील वार्ड क्रमांक सहा कऱ्हाडवाडी या भागातील पाणीटंचाई निवारण्यासाठी त्याचबरोबर डोणगाव ग्रामपंचायतला पाणीपुरवठा करण्यासाठी सन २०१२-१३ मध्ये पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली लावण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना अंतर्गत कोट्यावधी रुपये खर्च करून पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पाणी टंचाई निवारण्यासाठी मदनी धरणावरून पाईपलाईन करण्याची योजना आखण्यात आली.मात्र, ही योजना ही बारगळल्याने डोणगाव वासीयांचा पाण्याचा प्रश्न कायम राहिला आहे. आता जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पेनटाकळी धरणावरून पाईपलाईन करण्याची योजना आखण्यात आली आहे. मात्र, ही योजना ही पूर्णत्वास जाते की, डोणगाववासी यांच्या पाणीटंचाईची समस्या पाचवीला कायम राहते. असा प्रश्न डोणगाव वाशी उपस्थित करीत आहे.**

## डोणगाव येथील प्रकार : पाणी टंचाई पाचविलाच पुजलेली

## डोणगावकर अजून सुद्धा पाण्याच्या प्रतीक्षेत...

भाग २४




डोणगाव ग्रामपंचायत मधील एक भाग असलेल्या वार्ड क्रमांक सहा कऱ्हाडवाडी येथील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघावी यासाठी तब्बल ९५ लाख ४२ हजार रुपयांच्या निधीला मान्यता देऊन जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याच्या कामाला दोन वर्षांपूर्वी प्रारंभ करण्यात आला होता. मात्र, सदर योजनेचे काम अद्यापही पूर्ण न झाल्याने कऱ्हाडवाडीच्या नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे. परिणामी, पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करण्याची वेळ आली आहे.

आता राष्ट्रीय ग्रामीण जलजीवन मिशन योजना अंतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र या निधीतूनही डोणगावासीयांना पाणीपुरवठा होईल की नाही असा प्रश्न निर्माण होत आहे.या अगोदर कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करून दोन योजना अर्धवट पडलेले आहेत. एकीकडे शासन योजना राबवण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून खर्च करीत आहे. तर, दुसरीकडे प्रशासकीय उदासीनतेमुळे ग्रामस्थांच्या पाण्याचा प्रश्न तब्बल पंधरा वर्षापासून कायम आहे. डोणगाव वाशीयांना पाण्याची समस्या कायमची दूर व्हावी यासाठी राष्ट्रीय ग्रामीण योजनेअंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये डोणगाव येथे पाणीपुरवठा करण्यासाठी कोट्यावधी रुपयांच निधी त्या अगोदर सुद्धा डोणगाव वासीयांना पाणीपुरवठा करण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करून मादणी धरणावरून पाईपलाईन करण्यात आली मात्र योजना अर्धवट पडलेली आहे आता दोन योजना अर्धवट असताना तिसरी योजना मंजूर करण्यासाठी ग्रामपंचायतीने ठराव घेतलेला आहे.जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सदर पाणी टंचाईचा प्रश्न निकाली काढावा यासाठी योजना आखली आहे.मात्र, जलजीवन मिशनचे कामही पूर्ण होते की पहिल्या योजनेप्रमाणेच बारगळते असा प्रश्न जनता उपस्थित करीत आहेत. एकंदरीत कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च झाल्यानंतरही पाणीटंचाई कायम असल्याने योजना ह्या अधिकारी व ठेकेदार यांच्यासाठी राबवल्या जातात की काय असा प्रश्न डोणगाव वाशी उपस्थित करीत आहेत.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## पहिली महिला अंतराळवीर कल्पना चावला

आज १७ मार्च, भारतीय वंशाची अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांची जयंती. २१ वर्षापूर्वी त्यांच्या कोलंबिया या यानाला पृथ्वीवर परत येत असताना अपघात होऊन त्यात त्यांचा दुर्दवी मृत्यू झाला. त्यांच्या सोबत सहा अंतराळवीरांचा चमू देखील होता त्यांचा देखील या अपघातात दुर्दैवी अंत झाला. कल्पना या अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या पहिल्या महिला अंतराळवीर होत्या . त्यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणातील कर्नाल येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बनारसीलाल चावला तर आईचे नाव संयोगीता असे होते. त्यांच्या वडिलांचा औद्योगिक वस्तू निर्मितीचा व्यवसाय होता आणि आई गृहिणी होती. कल्पना चावला यांचे शालेय शिक्षण टागोर बाल निकेतन या विद्यालयात झाले. अभ्यासात हुशार असणाऱ्या कल्पना चावला यांनी १९८२ साली पंजाब विद्यापीठातून एरोनिटीकल अभियांत्रिकी पदवी मिळवली. त्यांनी १९८४ साली अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठातून एरोनिटीकल उच्च अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून कोलोरॅडो विद्यापीठातून एरोस्पेस अभियांत्रिकी विभागातून १९८८ साली डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. त्यांचे अंतराळवीर होण्याचे स्वप्न होते. ते पूर्ण करण्यासाठी त्या नासा या अमेरिकेतील अंतराळ संशोधन संस्थेत भरती झाल्या. १९८८ मध्ये त्यांनी नासातील एम्स रिसर्च सेंटर ओव्हरसेट मेथडसच्या उपाध्यक्षा म्हणून काम पाहिले. तिथे त्यांनी कॉम्प्युटीशनल फ्ल्यूईड डायनॅमिकमध्ये जागेवरच उभे उड्डाण आणि जमिनीवर उतरणे या विषयांवर संशोधन केले. त्यानंतर त्यांना ग्लायडर्स, सीलपेन्स तसेच एक किंवा अनेक इंजिन असलेली विमाने याच्या व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्याचा परवाना मिळाला. १९९१ साली त्यांना अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले. नागरिकत्व मिळाल्यावर त्यांनी १९९५ साली नासामध्ये अस्ट्रोनोट कॉर्प्स होण्यासाठी अर्ज केला. त्यांना त्यासाठी नासाने त्यांना प्रवेशही दिला. त्यांची मार्च १९९६ मध्ये पहिल्या उड्डाणासाठी निवड झाली. त्यांची पहिली अंतराळ मोहीम १९ नोव्हेंबर १९९७ रोजी चालू झाली. त्यांनी अंतराळात १०.६७ दशलक्ष किमी प्रवास केला. हे अंतर २५२ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्याऐवढे होते. कल्पना चावला यांना २००० साली त्यांच्या दुसऱ्या उड्डाणासाठी एसटीएस १०७ साठी देखील निवड झाली परंतु ही मोहीम तांत्रिक अडचणीमुळे लांबली जात होती. त्या १६ जानेवारी २००३ रोजी एसटीएस १०७ मोहिमेसाठी जाण्यासाठी कोलंबिया अंतराळ मोहिमेवर आल्या. या मोहिमेत कल्पना चावला यांना सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात प्रयोग करणे ज्यामध्ये ते आणि त्यांच्या चमुला ८० प्रयोग करावयाचे होते त्यात पृथ्वी आणि अंतराळ विज्ञान, अद्ययावत तंत्रज्ञान निर्मिती अंतरळवीरांचे आरोग्य आणि सुरक्षा या विषयांचा समावेश होता. आपली मोहीम फत्ते करून १ फेब्रुवारी २००३ रोजी हे अंतराळ यान कोलंबियाच्या टेक्सास येथे पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना आणि जमिनीवर उतरताना दुर्दवी अपघात झाला. या दुर्दवी अपघातात कल्पना चावला आणि त्यांच्या चमुचा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यूनंतर जगभर हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस सेवा पदक, नासा स्पेस फ्लाईट तसेच नासा विशेष सेवा पदकाने गौरविण्यात आले. जगभरातील विविध विद्यापीठांनी त्यांच्या नावे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या जाहीर केल्या. ५ फेब्रुवारी २००३ साली भारताच्या पंतप्रधानांनी हवामान विषयीच्या उपग्रहाला कल्पना १ हे नाव दिले. त्यानंतर सोडण्यात आलेल्या उपग्रहालाही कल्पना २ हे नाव देण्यात आले. हरियाणा सरकारने कल्पना चावला यांच्या नावाने ज्योतिसार, कुरुक्षेत्र येथे प्लेनेटेरियम सुरू केले. नासाने सुपर कॉम्प्युटरला कल्पना चावला यांचे नाव दिले. कल्पना चावला यांनी आपल्या धैर्य, चिकाटी, जिद्द आणि बलिदानाने देशाचे नाव उज्ज्वल केले. कल्पना चावला या आज आपल्यात नसल्या तरी त्यांच्या स्मृती आजही आपल्या मनात कायम आहे. कल्पना चावला यांचे कार्य आजच्याच नाही तर येणाऱ्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. पहिल्या महिला अंतराळवीर कल्पना चावला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# शेतकरी कैलास नागरे यांचं बलीदान व्यर्थ जाऊ देणार नाही


## केद्रीयमंत्री प्रतापराप जाधव यांनी घेतली नागरे कुटुबीयांची सांत्वनपर भेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** खडकपूर्णा धरणातील डाव्या कालव्याद्वारे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावं या मागणीसाठी युवा शेतकरी कैलास नागरे यांनी दिलेल बलीदान व्यर्थ जाऊ देणार नाही अशी ग्वाही केद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली.

बुलढाणा जिल्ह्याच्या देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाड या गावातील शेतकरी कैलास नागरे यांनी खडकपूर्णा धरणातील डाव्या कालव्याद्वारे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावं या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधीत विषारी औषध प्राशन करून आपल्या शेतामध्ये त्यांनी जीवन संपवले आज १६ मार्चला स्वगीय कैलास नागरे यांच्या रक्षा विसर्जनाचा कार्यक्रम शिवणी आरमाड येथे झाला. यावेळी





स्वर्गीय कैलास नागरे यांचे वडील अर्जुनराव नागरे यांची केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांत्वनपर भेट घेतली त्यांना धीर देत दुखःत सवेदना ही व्यक्त केल्यात केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की कैलासराव हे प्रयोगशिल शेतकरी होते शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांची तळमळ होती पण त्यांनी एवढ टोकाच पाऊल उचल ही दुदैव्याची गोष्ट आहे त्याच बलीदान व्यर्थ जाऊ देणार नाही.

विदर्भ आणि बुलडाणा जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष भरून करणारा वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्पाबाबत वेळोवेळी लोकसभेत प्रश्न्न उपस्थित करून तो मंजुर करून घेतला . या प्रकल्पासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात ८८ हजार ५५४ कोटी रुपये मंजुर केले हा प्रकल्प झाल्यावर बुलडाणा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न्न कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याचे ही त्यांनी सांगितले स्वर्गीय कैलास नागरे यांच्या रक्षा विसर्जनाच्या कार्यक्रमाला पंचकोशीतील ग्रामस्थ नागरीक उपस्थित होते

## 'या' सुपरस्टारसाठी १० वर्षे वाट पाहिली, तरीही तब्बूचं प्रेम कधी लग्नापर्यंत पोहोचलंच नाही!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री तब्बूने एका प्रसिद्ध अभिनेत्यासोबत लग्न करण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र, या नात्याला भविष्यात कोणताही मार्ग न दिसल्याने तिने एकटी राहण्याचा निर्णय घेतला. तब्बूने ज्या अभिनेत्यासाठी १० वर्षे वाट पाहिली, त्याचे नाव ऐकून तुम्हीही आश्र्चर्यचकित व्हाल.

तब्बूच्या आयुष्यातील अधुरी प्रेमकथा

९०च्या दशकातील काही लव्हस्टोरी आजही चाहत्यांमध्ये चर्चेत असतात. अशाच एका नात्याबद्दल बॉलिवूडमध्ये बरेच बोलले गेले, आणि त्याची मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे तब्बू. आपल्या अभिनय कौशल्याने लाखो हृदये जिंकणारी तब्बू तिच्या वैयक्तिक आयुष्याबाबत नेहमीच गूढ राहिली आहे.

५३ वर्षांची झालेली तब्बू अजूनही अविवाहित आहे. मात्र, एकेकाळी तिने १० वर्षे एका अभिनेत्यासाठी वाट पाहिली होती. हे नाते पुढे का गेले नाही आणि तिने एकटी राहण्याचा निर्णय का घेतला, याबाबत मोठा खुलासा झाला आहे.

अजय देवगण आणि तब्बूच्या अफेअरच्या चर्चा

तब्बूचे नाव अनेक कलाकारांसोबत जोडले गेले. सुरुवातीला संजय कपूरसोबत तिचे नाव चर्चेत आले होते. त्यानंतर साजिद नाडियाडवालासोबत तिच्या जवळीकतेच्या बातम्या आल्या. नंतर तब्बू आणि अजय देवगण यांच्या मैत्रीबद्दल अनेक अफवा पसरल्या. दोघांनी कधीच त्यांच्या नात्याला प्रेमसंबंधांचे स्वरूप दिले नाही. अजय आणि तब्बू नेहमीच चांगले मित्र असल्याचे सांगत आले आहेत.

तब्बूने १० वर्षे नागार्जुनची वाट पाहिली

तब्बूच्या आयुष्यात एक अशी व्यक्ती होती, ज्याच्यासाठी तिने तब्बल १० वर्षे प्रतीक्षा केली. हा कोणी दुसरा नसून तेलुगू सुपरस्टार नागार्जुन होता. चित्रपटांच्या सेटवर दोघांची भेट झाली आणि त्यांचे मैत्रीचे नाते हळूहळू प्रेमात बदलले. तब्बूला नागार्जुनसोबत आयुष्य घालवायचे होते. मात्र, या नात्याला भविष्य नव्हते कारण नागार्जुन आधीच विवाहित होता. त्याने स्पष्टपणे सांगितले होते की तो आपल्या पत्नीला घटस्फोट देणार नाही.

तब्बूने प्रेमापासून स्वतःला दूर केले

नागार्जुनसोबतचे नाते टिकवण्याचा प्रयत्न करूनही, तब्बूला शेवटी हे समजले की हे प्रेम कायमस्वरूपी टिकू शकणार नाही. त्यामुळे तिने स्वतःला या नात्यातून दूर केले. त्यानंतर तिने वैयक्तिक आयुष्याविषयी फारसे बोलणे टाळले आणि आजही ती अविवाहित आहे. मात्र, तब्बूने तिच्या करिअरवर पूर्ण लक्ष केंद्रित केले आणि स्वतःला एकटेपणातही आनंदी ठेवले. तिची ही प्रेमकथा अधुरी राहिली असली तरी, तिने तिचे आयुष्य स्वतःच्या मार्गाने घडवले.

## विधानपरिषदेची उमेदवारी देताना भाजपाकडून दोन नेत्यांचे राजकीय पुनर्वसन, बुथपातळीपासून काम केलेल्या नेत्यालाही संधी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं संदीप दिवाकर जोशी, संजय किशन केणेकर, दादाराव केचे या तिघांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपाचं राष्ट्रीय सचिव अरुण सिंह यांच्या स्वाक्षरीने या तिघांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

राज्यातील सत्ताधारी महायुतीमधील सहभागी पक्ष असलेल्या भाजपाला तीन जागा, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेला एक जागा आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसला एक जागा अशा पाच जागा विधानपरिषदेत आहेत. त्यापैकी भाजपानं आपलं तीन उमेदवार जाहीर केले आहेत.

संदीप जोशी यांचं राजकीय पुनर्वसन– भाजपानं उमेदवारी दिलेले संदीप जोशी हे नागपूरचे माजी महापौर आहेत. त्यांचे वडील दिवाकर जोशी हे विधानपरिषदेत शिक्षक मतदार संघातून निवडून गेले होते. संदीप जोशी नागपूर येथील संत तुकडोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून वाणिज्य शाखेचे पदवीधर आहेत. भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चामध्ये जोशी यांनी काम केलं आहे. २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी नागपूर पश्चिम मतदार संघातून संदीप जोशी इच्छुक होते. त्यांना विधानपरिषदेवर संधी देऊन संदीप जोशी यांचं राजकीय पुनर्वसन करण्यात आलं आहे. संदीप जोशी नागपूर महापालिकेचे चार वेळा नगरसेवक होते. नागपूर पदवीधर मतदारसंघातून ते भाजपाकडून रिंगणात उतरले होते. मात्र, काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. महाराष्ट्र राज्य लघुउद्योग महामंडळाच्या अध्यक्षपदी त्यांनी काम केलं आहे.

## ए.आर. रहमान यांना रुग्णालयातून मिळाला डिस्चार्ज, सीएम स्टॅलिन आणि त्यांचा मुलगा अमीन यांनी बरे झाल्याची केली पुष्टी


**मुंबई/प्रतिनिधी :** ऑस्कर विजेते संगीतकार ए.आर. रहमान यांना डिहायड्रेशन आणि मान दुखण्याच्या त्रास झाला होता. यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आता त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. याबद्दलची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी आणि काही लोकांनी दिली आहे. ५८ वर्षीय संगीतकार रहमान यांना डिहायड्रेशन आणि पोटाच्या समस्यांमुळे अस्वस्थ वाटत होते. यानंतर रुग्णालयात त्यांच्यावर अनेक चाचण्या करण्यात आल्या होत्या. आता त्याच्या टीमनं रहमान यांची प्रकृती ठिक असल्याचे सांगितले आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी रहमान यांच्याबद्दल सांगितले की ते आता बरे आहेत.

# नमाज पठनाबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञानाचे ज्ञान घेणे गरजेचे; मुस्लिम समाजामध्ये सर्वाधिक...; मंत्री नितीन गडकरी स्पष्टच बोलले

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** इतर कुठल्याही समाजापेक्षा मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाची सर्वाधिक गरज आहे. असे वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे. नागपूरमध्ये आयोजित दीक्षांत समारोह कार्यक्रमात ते बोलत होते. दिवसातून अनेक वेळा नमाज पठण करा. मात्र नमाज पठनाबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञानाचे ज्ञान घेणे गरजेचे आहे. इंजिनीयर, डॉक्टर, आयएएस तयार झाले तरच समाजाचा विकास होईल. जात, पंत, भाषा लिंग आणि धर्मामुळे माणूस ओळखला जात नाही तर माणसाकडे असलेल्या गुणांमुळे माणूस मोठा होतो, असेही नितीन गडकरी म्हणाले.

**'जो करेगा जाति की बात, उसको मारूंगा लात' : नितीन गडकरी**



सार्वजनिक चर्चेत आपण कधी जात आणि धर्म आणत नाही, कारण माझा विश्वास आहे की लोक समाजसेवा सर्वापेक्षा श्रेष्ठ मानतात. आम्ही या गोष्टींमध्ये (धर्मराजकारण) कधीही भेदभाव करत नाही. मी राजकारणात आहे आणि इथे खूप काही बोलले जातं, पण मी ठरवले की मी माझ्या पद्धतीने काम करेल. शिवाय मला कोणी मतं देईल की नाही याचा विचार मी करत नाही. असे ही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी सांगितले. ते जातीबाबत गडकरींनी आपल्या एका जुन्या घोषणांचाही उल्लेख केला. त्यात ते म्हणाले की, मी सुरुवातीपासून म्हणत आलो आहे 'जो करेगा जाति की बात, उसको मारूंगा लात'. निवडणुकीत हरलो किंवा मंत्रीपद गमवावे लागल्यानंतरही मी ही भूमिका कायम ठेवल्याचे ते म्हणाले.

**मंत्रिपद न मिळाल्यास मी काय मरणार नाही : नितीन गडकरी**

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, 'तुम्ही असे बोलायला नको होतं, असे माझे मित्र म्हणाले, पण मी आयुष्यात याच तत्त्वानुसार जगायचे ठरवले आहे. मी निवडणूक हरलो किंवा मंत्रिपद मिळाले नाही तर मी काय मरणार नाही. मात्र मी माझ्या भूमिकेवर आधीपासून ठाम आहे आणि राहील असेही ते म्हणाले.

**मुस्लीम समाजाला शिक्षणाची सर्वाधिक गरज– नितीन गडकरी**

यावेळी गडकरींनी आठवण करून दिली की, मी आमदार असताना अंजुमन-ए-इस्लाम इन्स्टिट्यूट (नागपूर) इंजिनिअरिंग कॉलेजला परवानगी दिली होती. मुस्लीम समाजाला याची गरज आहे, असे मला वाटत असल्याचे ते म्हणाले.'मुस्लीम समाजातून अधिकाधिक अभियंते, आयपीएस, आयएएस अधिकारी निर्माण झाले तर सर्वांचा विकास होईल. माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांचे उदाहरण आपल्यासमोर आहे. अंजुमन-ए-इस्लामच्या बॅनरखाली आज हजारो विद्यार्थी इंजिनिअर झाले आहेत. असेही ते म्हणाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शेतकऱ्यांच्या न्यायासाठी सरकार सकारात्मक; विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांची पत्रकार परिषदेत माहिती



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमध्ये आज महिलांच्या सामाजिक कार्यक्रमासाठी आले आहे. कुसुमाग्रज स्मारक येथे भेट दिली.कवी कुसुमाग्रज यांचे मला आशीर्वाद लाभले होते.अशी माहिती विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांची पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकरी आत्महत्या घटना वाढल्या आहेत. अशा घटना घडू नये, यासाठी सरकार काम करत आहे, प्रयत्न करत आहे.बीड मध्ये शिक्षकाने आत्महत्या केली ही बाब दुर्देवी आहे. शिक्षण विभाग त्या प्रकरणाची दखल घेईल. अधिवेशन सुरू आहे. मी संविधानिक पदावर असल्यामुळे मला इतर विषयांवर बोलता येणार नाही. कोणत्या मंत्र्याला विश्र्वासात घेतले किंवा नाही यावर मी बोलणार नाही. ऊसतोड कामगार महामंडळ सरकारने तयार केले आहे. ऊसतोड कामगार महामंडळाची तरतूद जी आहे. त्यावर काय काम सुरू आहे.यावर मी उद्या आठ जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांसोबत ऑनलाईन बैठक घेऊन आढावा घेणार आहे. शेतकऱ्यांच्या न्यायासाठी सरकार सकारात्मक आहे.असे मत विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केले.

### ठरवून ठार मारले? जंगलात रात्री नेमके काय घडले; मृत व्यक्तीची ओळख पटल्यानंतर एकच खळबळ उडाली

मंडला (मध्य प्रदेश) : मध्य प्रदेशातील मंडला जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहिमेदरम्यान ठार झालेला व्यक्ती नक्षली नसून आदिवासी असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. विरोधी पक्ष काँग्रेसने हा व्यक्ती निर्दोष असल्याचा दावा करत या प्रकरणाची उच्चस्तरीय आणि न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे नाव हिरन सिंह पार्थ (वय ३८) असून तो आदिवासी गटातील बैगा समुदायाचा सदस्य होता. ही चकमक ९ मार्च रोजी झाली होती आणि मृत व्यक्तीची ओळख गुरुवारी पटली. बालाघाट विभागाचे पोलीस महानिरीक्षक संजय कुमार यांनी सांगितले की, पार्थ मंडला जिल्ह्यातील खटिया परिसरातील जंगलात नक्षलवाद्यांसोबत होता.

कुमार म्हणाले, तो नक्षलवाद्यांसोबत कसा होता? हा तपासाचा विषय आहे. नक्षली अनेकदा आदिवासींसोबत फिरतात. आम्ही तपासानंतरच त्याचा नक्षलवाद्यांसोबत असलेला संबंध स्पष्ट करू शकतो. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, सध्या पार्थ नक्षली असल्याचा कोणताही पुरावा नाही. तो लसारा टोला गावचा रहिवासी होता. तसेच, या चकमकीनंतर नक्षलवाद्यांशी संबंध असलेल्या दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

### आनंदाची बातमी, सुनिता विल्यम्सला परत आणण्यासाठी यान पोहोचले

दिल्ली : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक : फक्त आठ दिवसांच्या विशेष मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले बुच विल्मोर आणि सुनिता विल्यम्स हे दोन अंतराळवीर मागील नऊ महिन्यांपासून तिथेच अडकले आहेत. तांत्रिक कारणामुळे त्यांना दोघांना अद्याप पृथ्वीवर परत आणता आलेले नाही. अखेर नासा आणि स्पेसएक्स यांनी एक संयुक्त प्रकल्प राबवून बुच विल्मोर आणि सुनिता विल्यम्स या दोघांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन परत पृथ्वीवर आणण्याची व्यवस्था केली आहे. दोन्ही अंतराळवीरांना परत घेऊन जाण्यासाठी एक अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले आहे. हे यान पोहोचताच बुच विल्मोर आणि सुनिता विल्यम्स या दोघांनी आनंद व्यक्त केला. अंतराळवीर सुनिता विल्यम्सने नृत्य करुन आनंद व्यक्त केला. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

फाल्कन नऊ रॉकेटच्या मदतीने क्रू १० मोहिमेच्या अंतर्गत ड्रॅगन नावाचे यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले आहे. या यानातून चार ताज्या दमाचे अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले आहेत. आता याच यानातून बुच विल्मोर आणि सुनिता विल्यम्स हे दोन अंतराळवीर पृथ्वीवर परतणार आहेत. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचलेल्या चार अंतराळवीरांपैकी दोन अमेरिकेचे एक जपानचा आणि एक रशियाचा आहे. अमेरिकेचे एन. मॅकलन आणि निकोल आयर्स, जपानचा तुकुया ओनिशी आणि रशियाचा किरिल पेस्कोव हे अंताळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले आहेत. नवे अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले त्यावेळी सुनिताने तिला झालेला आनंद नृत्य करुन साजरा केला. सर्व अंतराळवीरांनी एकमेकांची गळाभेट घेतली. बुच विल्मोर आणि सुनिता विल्यम्स पुढील काही दिवस नव्याने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर आलेल्या अंतराळवीरांना मार्गदर्शन करतील. नंतर बुच विल्मोर आणि सुनिता विल्यम्स ड्रॅगन यानातून पृथ्वीवर परततील.

# भाजपचे टोळ्या एकत्र येऊन स्थापन झालेले सरकार

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** टोळ्या एकत्र येऊन स्थापन झालेले सरकार म्हणजे भाजप आहे. गँग ऑफ सरकार असून या सरकारमध्ये मान पानाचा खेळ सुरू आहे. असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकारणात आम्हाला महाविकास आघाडी करताना अडचणी आल्या, तर, महाराष्ट्राची सद्भावना लयाला नेण्याचे काम भाजपने केले. खोक्या रिटर्न्स, नवीन खोक्या जन्माला आला आहे. या अगोदर पन्नास कोटी एकदम ओके अस ऐकले होते. कोकणातील सामाजिक स्वास्थ भाजपकडून बिघडविली जात आहे. कोकणातील नैसर्गिक साधन संपत्ती सत्ताधाऱ्यांना उद्योजकांना विकायची आहे. उद्योगपतींना सांभाळण्याकरिता कोकणातल्या सामान्य माणसाचा बळी देऊ नका,असा टोलाही यावेळी सपकाळ यांनी लगावला.

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातकडे वळवले जात आहेत. मुंबई गुजरातमध्ये गेली नाही याचे शल्य दिल्लीतल्या दोन नेत्यांना आहे. औरंगजेब आणि देवेंद्र फडणवीस सरकारचा कारभार एकसारखा आहे. मराठी माणसांचा इतिहास महाराजांचा इतिहास पुसून टाकायचा आहे. मराठी माणसांना औरंगजेबाला आपल्या मराठी मातीत गाडले. औरंगजेबाची कबर ही महाराजांच्या शौर्याची निशाणी आहे. शिवाजी महाराजांचे शौर्य पुसण्याचा डाव औरंगजेबाचा उदत्तीकरण कोणीही केलेले नाही. संजय राऊत यांना त्यांच्या पक्षामधील जास्ती माहिती आहे. या संदर्भातील



मला माहिती नाही. देवेंद्र फडणवीस यांच्या जॅकेटच्या खिशात महाराष्ट्राची सत्ता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका भाजप घेणारच नाही. ऑक्टोबरचा पेपर आहे. मार्चमध्ये त्यावर मी बोलणार नाही अशी प्रतिक्रिया यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली.

## राज्यात अराजकता पसरवण्याचा डाव आहे

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा पत्रकार परिषद आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** संभाजी नगरमध्ये दुषीत वातावरण नाही. काही हिंदू संघटना जरूर काही मागणी करत आहेत. मात्र, त्यांचंं सरकार आहे.एकीकडे केंद्राकडून निधी दिला जातो. दुसरीकडे आंदोलनाची हाक दिली जात आहे.

दोन्ही बाजूने ढोल वाजवले जात आहे. औरंगजेबाच्या विचाराचे विरोध नक्कीच आहे. अतुल भातखळकर काय मुख्यमंत्री त्यांचेच आहे. एक पत्र लिहा आणि काढून टाका. समाजात अशांतता कशासाठी बाबरी पाडताना ते आमचे लोक नाही म्हणणारे हेच आहेत.महाराष्ट्रात अराजकता पसरवण्याचा डाव आहे. असा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, नितेश राणे त्यांच्याविषयी



बोलणं म्हणजे आपलं तोंड खराब करण्यासारखे आहे. बुलढाण्यातील आदर्श शेतकऱ्याने आत्महत्या केली. १८ वर्ष विना पगाराने काम केले आहे. विना अनुदानीत संस्था कम करतात त्याची नियमावली तपासायला हवी. लाडकी बहिण निवडणुकीचा जुमला म्हणून ही योजना होती. शिंदेंनी १५०० चे २१०० करण्याचे आश्वासन दिले.आदीवासी विभाग, सामाजिक न्यायचा निधी वळवला.याच लाडक्या भावाला भाजपने बसवून टाकले. सरकार नुसते घोषणा करतयं, मात्र, राज्याची आर्थिक परिस्थिती योग्य नाही.अंथरूण पाहून पाय पसरायला हवे. मात्र, त्याहून बाहेर आहेत.शिंदे किंवा इतर मंत्र्याना विचारतयं कोण? यांना साधं याचे पीए मागून मिळत नाही. विचारतयं कोणं ? हे नुसते पेन काळे करत बसलेत.असा चिमटा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची पत्रकार परिषद घेतला.

## पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात सैन्यावर आत्मघातली हल्ला; अनेक पाक सैनिक ठार

इस्लामाबाद : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात रविवारी सैन्याच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्यात अनेक सैनिक ठार झाले आहेत. दक्षिण-पश्चिम पाकिस्तानमध्ये सुरक्षा दलांना घेऊन जाणाऱ्या बसजवळ रस्त्याच्या कडेला बॉम्बचा स्फोट झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. स्थानिक पोलीस प्रमुख जफर जमानानी यांनी सांगितलं की, हा हल्ला बलुचिस्तानमधील नौश्की जिल्ह्यात झाला. स्फोटामुळं जवळच असलेल्या आणखी एका बसचंही मोठं नुकसान झालंय. मृत व जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलंय.

स्फोटकांनी भरलेले वाहन सैन्याच्या ताफ्याला धडकवलं : प्राथमिक तपासात हा आत्मघाती हल्ला असल्याचं दिसतंय. एका आत्मघाती हल्लेखोरानं स्फोटकांनी भरलेले वाहन सैन्याच्या ताफ्यावर घातल्यानं मोठा स्फोट झाला. पाकिस्तानी वृत्तपत्र 'द डॉन'ने अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं म्हटलं आहे की, नोशाकी येथील राष्ट्रीय महामार्गावर पाकिस्तानी सैन्याच्या फ्रंटियर कॉर्प्स (एफसी) च्या ताफ्यावर हा हल्ला करण्यात आला.

कोणीही जबाबदारी स्वीकारली नाही : बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सर्फराज बुगती यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. या घटनेची सध्या तरी कोणीही जबाबदारी स्वीकारली नाही, मात्र, बलुच लिबरेशन आर्मीनं हा हल्ला केला असल्याचा संशय स्थानिकांनी व्यक्त केला. याच संघटनेने काही दिवसांपूर्वी ट्रेनवर हल्ला केला होता, सुमारे ४०० लोकांना त्यावेळी ओलीस ठेवले होते. तसेच २६ ओलिसांना ठार मारले होते.

काय आहे हल्लेखोरांची मागणी? : हल्ल्यानंतर सुरक्षा दलाने या भागात ऑपरेशन राबवत सर्व ३३ हल्लेखोरांना ठार केलेय. तेल आणि खनिजांनी समृद्ध बलुचिस्तान हा पाकिस्तानचा सर्वात मोठा आणि कमी लोकसंख्या असलेला प्रांत आहे. जातीय बलूच रहिवाशांनी केंद्र सरकारवर भेदभावाचा आरोप केला आहे. इस्लामाबादने हा आरोप फेटाळून लावला आहे. त्यामुळे बलुच लिबरेशन आर्मी केंद्र सरकारकडे स्वातंर्त्याची मागणी करत आहे.

## मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथे रुग्णालयात भीषण आग!

## खिडक्यांच्या काचा फोडून १९० हून अधिक रुग्णांना वाचवले

**ग्वाल्हेर :** मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर शहरातील एका सरकारी रुग्णालयात रविवारी पहाटे आग लागल्याची भीषण घटना समोर आली. या आगीच्या घटनेनंतर १९० हून अधिक रुग्णांना रुग्णालयातून वाचवण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, असेही अधिकार्यांनी सांगितले आहे.

नेमके झाले काय?

ग्वाल्हेरच्या जिल्हाधिकारी रुचिका चौहान यांनी या घटनेबद्दल माहिती देताना सांगितले की, कमला राजा रुग्णालयाती पहाटे १ च्या सुमारास स्त्रीरोग विभागाच्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) एअर कंडिशनरमध्ये आग लागली. १९० हून अधिक रुग्णांना ज्यामध्ये १३ आयसीयूमधील रुग्णांचा देखील समावेश होता, या आगीतून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले आणि दुसऱ्या रुग्णालया हलवण्यात आले, असेही अधिर्कायांनी सांगितले.

कमला राजा रुग्णालयाच्या स्त्रीरोग विभागात शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असण्याची शक्यता आहे, अशी माहिती राज्याच्या जनसंपर्क विभागाने जारी केलेल्या निवेदनात देण्यात आली आहे.

आगीच्या घटनेची होणार चौकशी

रुग्णालयाच्या सुरक्षा रक्षक आणि वॉर्ड बॉय यांनी खिडक्यांच्या काचा फोडून तात्काळ आयसीयूमध्ये भरती असलेल्या सर्व रुग्णांना बाहेर काढले आणि त्यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे चौहान म्हणाल्या. आयसीयू आणि इतर वॉर्डमध्ये भरती होते ते सर्व रुग्ण सुरक्षित आहेत, तसेच या आगीच्या घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याचेही त्यांनी नमूद केले.

आयसीयूमधील १३ रुग्णांना आणि रुग्णालयाच्या इतर वॉर्डमधील जवळपास १८० रुग्णांना बाहेर काढून मेडिकल कॉलेज कॅम्पसमधील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले, असे निवेदनात म्हटले आहे.

रुग्णांची काळजी घेणाऱ्या एका व्यक्तीने सांगितले की, ''आग लागल्यानंतर रुग्णालयाचा परिसर धुराने भरला होता. कर्मचाऱ्यांनी तात्काळ सर्व रुग्णांना हलवण्यास सुरुवात केली. त्यावेळी काहीही दिसत नव्हते. सध्या आमचा रुग्ण व्यवस्थित आहे आणि त्याला नवीन ठिकाणी ठेवण्यात आले आहे.''

### नाईट क्लबमध्ये म्युझिक कॉन्सर्टमध्ये आतषबाजी करताच आग लागली, ५० होरपळून मेले; १०० जखमी

दिल्ली : शनिवारी रात्री एका नाईट क्लबला लागलेल्या आगीत किमान ५० जणांचा मृत्यू झाला असून १०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कोकानी शहरात आयोजित एका हिप हॉप संगीत कार्यक्रमादरम्यान आगीची भीषण घटना घडली. सुमारे ३०,००० लोकसंख्या असलेल्या या शहरातील नाईट क्लबमध्ये प्रसिद्ध हिप-हॉप जोडी एडीएन चा संगीत कार्यक्रम सुरू असताना आग लागली. या कॉन्सर्टसाठी क्लबमध्ये १५०० लोक जमले होते. असे मानले जात आहे की कार्यक्रमादरम्यान कोणीतरी क्लबच्या आत फटाके फोडले, ज्यामुळे आग लागली. आग लागल्यानंतर गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरीत काही लोक चिरडले गेले. युरोपियन देश नॉर्थ मॅसेडोनियामध्ये ही घटना घडली. पंतप्रधान ह्रस्टिजन मिकोव्स्की यांनी एक्स वर लिहिले की, उत्तर मॅसेडोनियासाठी हा एक कठीण आणि अतिशय दु:खाचा दिवस आहे. इतक्या तरुणांच्या दुर्दैवी मृत्यूची भरपाई कधीच होऊ शकत नाही. या कठीण काळात पीडितांचे दु:ख कमी करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये इमारतीच्या छताला लागलेली आग दिसून येत आहे. अपघातानंतर नाईट क्लबमधून आगीच्या ज्वाळा उसळल्या. आतषबाजीनेच ही आग भडकल्याची माहिती आहे.

## नेरूरमधील रोंबाट (मांड) उत्सव अलोट गर्दीत संपन्न, शिमगोत्सवातील अनोखी परंपरा







दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** होळी सणानिमित्त कुडाळ तालुक्यातील नेरूर गावात सायचे टेंब येथे मांड उत्सव प्रचंड गर्दीत साजरा करण्यात आला.

यावेळी पारंपरिक पद्धतीने सुरू असलेले रोंबाट व पौराणिक प्रसंग, कथांवर आधारित देवदेवतांच्या भव्य-दिव्य विराट स्वरूपाच्या प्रतिकृती, देखावे साकारण्यात आले. हे देखावे पाहण्यासाठी जिल्ह्यातीलच नव्हे तर परराज्यांतून नागरिकांनी गर्दी केली होती. या मांड उत्सवामुळे नेरूर येथील शिमगोत्सवाची एक वेगळीच ओळख निर्माण झाली आहे.

मागील अनेक वर्षे सुरू असलेल्या या होळी उत्सवामुळे कोकणातील रूढी-परंपरांचे जतन नेरूरवासीय करीत आहेत हे विशेष आहे. कुडाळ तालुक्यातील नेरूर हे कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक व इतर क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहिले आहे.

विशेष म्हणजे गावची ग्रामदेवताच श्री देव कलेश्वर असून या गावात सर्व क्षेत्रातील कलाकारांची खाण होय. होळी सण येथील ग्रामस्थ मोठ्या उत्साहात साजरा करतात. या गावातील होळी सणानिमित्त असणारे रोंबाट हे खास आकर्षण असते. रसिक नागरिक या रोंबाटाची दरवर्षी आतुरतेने वाट पाहत असतात. यावर्षी आना मेस्त्री, विलास मेस्त्री, कृष्णा मेस्त्री ग्रुपने पौराणिक भव्य-दिव्य देखावे सादर केले होते. तारकासुरवध, पंचमुखी शंकर, वीरभद्र, नंदी, गणेश अवतार हे भव्य दिव्य देखावे सायचे टेंब नेरुरच्या मांड उत्सवाचे आकर्षण ठरले.

# कैलास नागरे यांच्या कुटुंबांना शासनाने तात्काळ मदत करावी

## अजून किती कैलासांना सरकार कैलासवासी करणार ? : आमदार सिद्धार्थ खरात

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाचा युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त प्रयोगशील शेतकरीच शेती आहुती मागतेय असे पत्र लिहून जीवन संपवत असेल तर राज्यात सर्वसामान्य शेतकऱ्यांची काय अवस्था आहे, हे शेतकरी कैलास नागरे यांच्या आत्महत्येवरुन अधोरेखित होते. कैलास नागरे यांची ही आत्महत्या नसून सरकारी व्यवस्थेने त्यांचा घेतलेला बळी आहे. अजून किती कैलासांना सरकार कैलासवासी करणार आहे ? असा संतप्त सवाल मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला आहे. कैलास नागरे यांच्या कुटुंबियांना तात्काळ मदत मिळावी, अशी मागणीही आमदार सिद्धार्थ खरात यांनी केली आहे.

शेतकरी कैलास नागरे यांच्या कुटुंबियांना आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांत्वनपर भेट दिली. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, उच्चशिक्षित असलेले कैलास यांना शेतीची अत्यंत ओढ होती. शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करून शेती नफ्यात कशी येईल यासाठी कायम ते प्रयत्नशील असायचे . त्यांचं अख्ख कुटुंब शेतामध्ये राबराब राबायचं. नुकतीच कैलास यांनी आपल्या शेतामध्ये खरबूज पिकाची लागवड केली होती परंतु शिवणी आरमाळच्या धरणामध्ये पाण्याची कमतरता असल्यामुळे उभ पीक शेतामध्ये पाण्याअभावी सुकायाला लागले होते. आणि त्यामध्ये कैलास यांचे जवळपास आठ लाख रुपये नुकसान देखील झालेले आहे. अशा विदारक परिस्थितीत कवी मनाचा संवेदनशील कैलास यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. कैलास यांनी केलेली आत्महत्या ही आत्महत्या नसून ही या व्यवस्थेने केलेली हत्याचं असल्याचे आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले.






### सरकारने कैलास नागरे यांच्या मागणीला गांभीर्याने का घेतले नाही?

आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की,सामाजिक जाणीव असलेले कैलास वेगवेगळे आंदोलन करून सामाजिक प्रश्न्न हाताळायचे त्यामध्ये त्यांनी उशालाला असलेल्या खडकपूर्णा धरणाचे पाणी अंचरवाडी फाट्यावरून जाणाऱ्या कालव्यातून अंढेरा येथील रामेश्र्वर धरणामध्ये सोडावे आणि नैसर्गिकरित्या प्रवाह असलेल्या नदीच्या प्रवाहातून शासनाच्या तिजोरीवर कुठलाही भार न पडता. शिवणी आरमाळ धरणामध्ये हे पाणी सोडावं. अंढेरा आणि शिवणी आरमाळ या परिसरातील बऱ्याच गावाचा पाणी प्रश्र्न सोडवावा त्यासाठी त्यांनी उपोषण सुद्धा केले.शासन दरबारी अनेक निवेदने दिली. परंतु कैलास यांच्या मागणीला गांभीर्याने घेतल्या गेले नाही. परिणामी कवी मनाचा संवेदनशील कैलास यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. मी कैलास यांच्या कुटुंबियांच्या दुःखामध्ये सामील असून कैलास यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा आणि त्यांची पत्नी आणि मुलं यांना शासनाने त्वरित मदत द्यावी, अशी आग्रही मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी केली.

# मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा पोलिसांची रविकांत तुपकरांना नोटीस





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जाहीर केलेल्या मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा पोलिसांनी रविकांत तुपकर यांना आज नोटीस बजावली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न्न पाहता आंदोलन करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल असे या नोटीस मध्ये नमूद आहे. दरम्यान, अशा नोटिसेसला घाबरत नाही. काहीही झाले तरी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन करणारच अशी भूमिका रविकांत तुपकर यांनी जाहीर केली आहे.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, पिकविमा, सोयाबीनचा-कापसाचा भावफरक यासह सोयाबीन-कापूस, ऊस, कांदा, धान, दूध उत्पादकांना मदत व भाव वाढ आणि शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी शेतकरी १९ मार्च रोजी रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात अरबी समुद्रात सातबारे बुडवून कर्जमुक्त झाल्याची घोषणा करणार आहेत. तसेच सोयाबीन कापूस बुडवून शासनाचे लक्ष वेधणार आहेत. या आंदोलनात सहभागी होऊन स्वतःला कर्जमुक्त करण्यासाठी गावागावातील शेतकरी मुंबईला जाण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून येत आहे. १८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता बुलढाणा शहरातील क्रांतिकारी हेल्पलाइन सेंटर वरून रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात सर्व शेतकरी मुंबईकडे निघणार आहेत. दरम्यान, या आंदोलनाच्या पार्श्र्वभूमीवर बुलढाणा पोलिसांनी रविकांत तुपकर यांना कलम १६८ नुसार नोटीस बजावली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न्न तसेच इतरांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने आंदोलन करू नये अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल असे नोटीसमध्ये नमूद आहे. तर दुसरीकडे रविकांत तुपकर आपल्या आंदोलनावर ठाम आहेत. अशा नोटिसेसने आपल्या घरातील कपाट भरलेले आहे. या नोटीसला आम्ही घाबरत नाही असे रविकांत तुपकर यांनी सांगितले आहे. आमचे आंदोलन दडपण्याचा आणि शेतकरी चळवळ बंद पाडण्याचा हा शासनाचा आणि प्रशासनाचा डाव आहे. परंतु आम्ही डगमगणार नाही. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्ही आंदोलन करणारच अशी भूमिका रविकांत तुपकर यांनी जाहीर केली आहे. या आंदोलनात कुठेही हिंसा होणार नाही, कायदा हातात घेतला जाणार नाही आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत, तरीही पोलिसांनी नोटीस देऊन आमचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे. अशा कितीही नोटीस दिल्या तरी आम्ही आंदोलन करणारच असे रविकांत तुपकर यांनी सांगितले आहे.

### धक्कादायक! प्रेम प्रकरणातून १८ वर्षीय तरुणाला अमानुष मारहाण, उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधी :** राज्यात प्रेम प्रकरणातून मारहाणीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत चालल्या आहेत. अशातच काही दिवसांपूर्वी धाराशिवमधील १८ वर्षीय तरुणाला प्रेम प्रकरणातून अमानुष पद्धतीने मारहाण करण्यात आली होती. मारहाण झालेल्या तरुणाचे नाव माऊली गिरी होते.मारहाण झाल्यानंतर माऊली गिरीला सोलापुरातली खाजगी रुग्णालयात उपचारासाठी आणले होते. गेल्या काही दिवसांपासून खाजगी रुग्णालयात माऊलीवर उपचार सुरु होते. मात्र, मारहाणीनंतर चौथ्या दिवशी मृत्यूशी झुंज देणाऱ्या १८ वर्षीय माऊली गिरीचा अखेर उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.


दरम्यान, माऊली गिरीला मारहाण झाल्यापासून तो शुद्धीवर आला नसल्याची माहिती त्याच्या आई-वडिलांनी दिली. तो गेल्या काही दिवसांपासून सोलापुरातील खाजगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात होता. एकुलता एक मुलाचं काही बरं वाईट झालं तर आम्ही आत्महत्या करू असे म्हणत आईनं आक्रोश केला होता. त्यासोबत माऊली गिरीला मारहाण करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी माऊलीच्या आई-वडिलांनी केली आहे.

धाराशिवमधील १८ वर्षीय माऊली गिरीला प्रेम प्रकरणातून ७ ते ८ जणांच्या टोळक्याकडून लोखंडी रोड, काठीने अमानुष पद्धतीने मारहाण करण्यात आली होती. मारहाणीनंतर माऊलीला मृत समजून त्याला भूम तालुक्यातील पांढरेवाडी येथील शिवारात विवस्त्र अवस्थेत फेकून देण्यात आले होते. त्याचबरोबर माऊलीच्या गुप्तांगालाही मोठ्या प्रमाणात इजा करण्यात आली होती. अमानुष पद्धतीने मारहाण केल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याचे आरोपींना समजले. आरोपींनी त्याला विवस्त्र अवस्थेत फेकून दिले आणि निघून गेले.

त्यानंतर माऊली गिरीला सोलापुरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. माऊली गिरी मारहाण प्रकरणी मुख्य आरोपी सतीश जगतापसह सात जणांविरोधात अंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री यांना स्वत: भेटून मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार; आमदार सिद्धार्थ खरात यांची ग्वाही

## डोणगाव येथील आगग्रस्त भागाची केली पाहणी







दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** शहरातील भाजी मंडी परिसरातील १० मार्च रोजी रात्री तीन ते चार वाजताच्या दरम्यान अचानक आग लागून या आगीत तब्बल न दुकाने जळून खाक झाली होती या मुळे गोरगरीब जनतेची कुटुंब उघड्यावर आली होते.या अगग्रस्तस्त भागाची आमदार सिद्धार्थ खरात यांनी १६ मार्च रोजी पाहणी करून अगस्त दुःखद दुकानदारांना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी माध्यमांशील बोलताना सांगितले.

डोणगाव येथील भाजी मंडी परिसरात १० मार्च रोजी रात्री २ ते ३ वाजता च्या दरम्यान अचानक आग लागल्याने या आगीत भाजी मंडी परिसरातील तब्बल नऊ दुकाने जळून खाक झाले होते. यामध्ये हार, फुल, भांडार कटलेरी आधी सटरफटर व्यवसाय करून कुठ कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे लोक व्यवसाय करीत होते.मात्र १० मार्च च्या रात्री अचानक त्यांच्या या किरकोळ दुकान व्यवसाय करणाऱ्या दुकानाला आग लागल्याने या आगीत तब्बल नऊ दुकाने जळून खाक झाली होती. तर त्यामध्ये २० लाख २१ हजार रुपयांच्या जवळपास नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच आमदार सिद्धार्थ खरात यांनी अधिवेशन होताच मतदार संघात आल्यानंतर अगग्रस्त भागाची पाहणी केली त्याचबरोबर प्रत्येक दुकानदारांना भेटून त्यांनी मानसिक दृष्ट धीर दिला.

यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले. की, किरकोळ व्यवसाय करणाऱ्या या दुकानदारांवर संकट आल्याने त्यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे. जवळपास २० लाख रुपयांच्या वर नुकसान झाल्याची माहिती असून संबंधित अहवाल हा तहसीलदार यांच्यामार्फत महसूल प्रशासनाला देण्यात आला आहे. याबाबत मी मुख्यमंत्री यांची भेट घेणार असून प्रत्येक नुकसानग्रस्तांना मुख्यमंत्री सहायता निधीतून निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिली. त्यांच्यासोबत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे. तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव. मेहकर शहराध्यक्ष किशोर गारोळे. सह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### खडकपूर्णा धरणावरील बुलढाणा शहराला १७७ कोटी ६४ लक्ष रुपये किंमतीच्या पाणीपुरवठा योजनेचा जलपूजन सोहळा आ. संजय गायकवाड यांच्या हस्ते संपन्न





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या येळगाव धरण येथे बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते १७७ कोटी ६४ लक्ष रुपये किमतीच्या खडकपूर्णा धरणावरील बुलढाणा शहर व पाणीपुरवठा योजनेचा जलपूजन सोहळा संपन्न झाला. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गणेश पांडे, कार्यकारी अभियंता कृष्णा आव्हाड, शिवसेना जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, शहराध्यक्ष गजेंद्र दांदडे, युवासेना शहर प्रमुख श्रीकांत गायकवाड यांच्यासह शिवसेना युवासेना पदाधिकारी कार्यकर्ते तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### शिवनेरी किल्ल्यावर मधमाशांचा हल्ला; ४० ते ५० शिवभक्त जखमी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** सोमवारी (दि.१७) सर्वत्र तिथी नुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरा केली जाणार आहे. तत्पूर्वी किल्ले शिवनेरीवर शिवभक्तांची मोठी गर्दी होत आहे. आज (दि.१६) मधमाश्यांनी किल्ल्यावर जमलेल्या शिवभक्तांवर हल्ला चढवला. यात सुमारे ४० ते ५० शिवभक्त जखमी झाले आहेत. त्यांना तत्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं आहे.

खासदार निलेश लंकेंनी केली शिवभक्तांची विचारपूस : सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या स्वराज्यातील गड किल्ल्यांचे संवर्धन करण्याची मोहिम महिन्यातून एका रविवारी करण्याचा संकल्प खासदार निलेश लंके यांनी केला होता. या मोहिमेची सुरूवात किल्ले शिवनेरी इथून झाली. किल्ल्याचे संवर्धन करण्याची मोहिम सुरू असताना मधमाश्यांनी अचानक केलेल्या हल्ल्यामुळे शिवभक्तांनी धावपळ केली. मधमाशांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शिवभक्तांना खासदार निलेश लंके यांनी मदत करत उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. यानंतर रूग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

शिवनेरी किल्ल्यावर सोमवारी (दि.१७) होणाऱ्या पारंपरिक शिवजयंतीच्या निमित्ताने अनेक शिवभक्त किल्ल्यावर दाखल होत आहेत. यावेळी अनेक शिवभक्त ज्योत घेण्यासाठी किल्ल्यावरील शिवाई देवी मंदिराकडं येत असतात. या ज्योतच्या धुरामुळे आणि लहान मुलांनी मधमाशांच्या पोळ्यावर दगड मारल्याने मधमाशांनी शिवभक्तांवर हल्ला केला. यामध्ये सुमारे ४० ते ५० शिवभक्त जखमी झाले आहेत. जखमी शिवभक्तांना उपचारासाठी ग्रामीण रूग्णालय जुन्नर इथं दाखल केलं आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र, आज दिवसभर कोणीही किल्ल्यावर जाऊ नये,'' अस आवाहन जुन्नर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी केले.

### बीडच्या गुंडाराजचा आणखी एक बळी, ट्रकमालकाने ड्रायव्हरला दोन दिवस कोंडले, बेदम मारहाणीत तरुणाचा मृत्यू

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या मस्साजोगमध्ये संतोष देशमुख यांच्या हत्येने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. बीडमध्ये राखेतून चाललेली गुंडगिरी, दहशत, मारहाणीच्या घटना गुन्हेगारीचा केंद्रबिंदू झालेल्या असताना बीडच्या आष्टी तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे . बीडमध्ये आष्टी तालुक्यात ट्रक मालकाकडून चालकाला डांबून ठेवत बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत चालकाचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे .या प्रकरणात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून एकाला पोलिसांनी ताब्यात घेतलंय . सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची पुनरावृत्ती झाल्याचा संशय सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी व्यक्त केलाय .

गेल्या अनेक दिवसांपासून एकच प्रश्न सातत्याने विचारला जातोय, बीडमध्ये नक्की चाललंय काय? बीडमध्ये गुन्हेगारी घटनांनी अक्षरश: कळस गाठला आहे. आष्टीमध्ये ट्रकमालकाने चालकाला दोन दिवस डांबून ठेवत बेदम मारहाण केली असून या मारहाणीत चालकाचा मृत्यू झाल्याने बीड सून्न झालंय. तसेच बीडच्या एका शिक्षकाने फेसबूक पोस्ट करत आत्महत्या केल्याची घटनाही घडलीय.